| | | |
|---|---|---|
| Success Key Test Series | **SUCCESS KEY TEST SERIES**<br>IX (English)<br>**(Unit Test -1 Marathi ch- 2,3.4)**<br>Marathi-(2(?),(? ),3,4) | DATE: 18-09-19<br>TIME: 1.30 hrs<br>MARKS: 40 |

SEAT NO:

**विभाग १ - गदय**

**प्र. १ खालील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

1) 1. कृति पूर्ण करा. 1

रेल्वेप्रवास करावा म्हणून लोकांना देण्यात येणारे इनाम. → ☐ → ☐

2. उत्तरे लिहा

i. लोकांची समजूत काढणारे.- ☐ 1

ii. रेल्वे मुळे ठाणे-मुंबई प्रवासासाठी लागणारा वेळ - ☐

अखेर दर माणशी एक रुपया इनाम आणि मोफत प्रवासाचा डंका वाजवला पैशाच्या लालुचीने ठाण्याच्या घंटाळीवरचे आणि मुंबईचे लोक आगगाडीने जाऊ लागले का त्यांच्या घरची माणसे आजूबाजूला उभी राहून ठणाण धाय मोकलायची. त्यांची समजूत काढता काढता रेल्वेचे अधिकारी अगदी टेकीला यायचे. एकदा ते प्रवासी ठाणे-मुंबईची सफर करून सुखरूप परत आले, म्हणजे मग मात्र चौकशी करणाऱ्यांचे घोळकेच्या घोळके त्यांच्याभोवती जमायचे. रुपयांचे इनाम पुढे आठ आण्यांवर आले. नंतर चार आणे झाले. लोकांचा धीर चेपलासे पाहून, इनामे बंद झाली नि सर्रास तिकिटे चालू केली. एरवीचा ठाणे-मुंबईच्या बैलांच्या खटारगाडीचा प्रवास म्हणजे तब्बल एक दिवस खायचा; पण आता काय, अवघ्या सव्वा तासात ठाण्याचा आसामी मुंबईला येऊ जाऊ लागला. मग मात्र लोकांची झुंबड लागली.

2) अ. एका वाक्यात उत्तरे लिहा. 1

i. पैशाच्या मोहाने कोणते लोक आगगाडीने जाऊ लागले ?

ब. सत्य की असत्य ते लिहा.

i. मुंबई-ठाणे प्रवासासाठी सुरुवातीपासून तिकिटे चालू केली

ii. ठाणे-मुंबई प्रवासासाठी हळूहळू लोकांची झुंबड उडाली 1

3) 1. समानार्थी शब्द लिहा. 1

i. बक्षीस - ................

ii. फुकट - ................

2. विरूध्दार्थी शब्द लिहा.

i. अधिकारी × ............... 1

ii. मृत × ...............

4) स्वमत :- 2

पहिल्यांदा केलेल्या रेल्वेप्रवासाचा अनुभव लिहा.

**विभाग २ - पदय**

**प्र. २ (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

1) **कोष्टक पूर्ण करा.** 2

| वाट बघणारा | कोणाची वाट बघतो | वाट बघण्याचे कारण |
|---|---|---|
| भुकेलेले बाळ | ............... | ............... |
| ............... | पांडुरंगाची | ............... |

भेटीलागीं जीवा लागलीसे आस |
पाहे रात्रंदिवस वाट तुझी ||१||

पूर्णिमेचा चंद्रमा चकोराजीवन |
तैसें माझें मन वाट पाहे ||२||

दिवाळीच्या मुळा लेंकीं आसावली |
पाहातसे वाटुली पंढरीची ||३||

भुकेलिवा बाळ अति शोक करी |
वाट पाहे उरि माउलीची ||४||

तुका म्हणे मज लागलीसे भूक |
धांवूनि श्रीमुख दांवी देवा ||५||

2) **1. जोडया लावा.** 1

| **अ-गट** | **ब-गट** |
|---|---|
| i. संत तुकाराम | अ) लेखी |
| ii. चकोर | ब) श्रीमुख |
| | क) पौर्णिमेचा चंद्र |

**2. सत्य विधाने लिहा.** 1

i. दिवाळीमुळे लेकीना माहेरी जाण्याची आस लागली आहे.

ii. संत तुकाराम पंढरीला जाण्याची वाट पाहत नाही.

3) **काव्यसौदर्य करा.** 2

तुका म्हणे मज लागलीसे भूक |
धांवूनि श्रीमुख दांवी देवा ||५||

4) **स्वमत :-** 2

संत तुकाराम यांच्या विषयी थोडक्यात माहिती लिहा.

**(आ) प्रस्तुत कवितेचे पुढील कृतिनिहाय रसग्रहण करा.** **(4)**

संतकृपा झाली |
इमारत फळा आली ||१||

ज्ञानदेवें रचिला पाया |
उभारिलें देवालया ||२||

नामा तयाचा किंकर |
तेणें रचिलें तें आवार ||३||

**विभाग ३ - स्ठ्लवाचन**

**प्र. ३ स्थूलवाचन** **(6)**

1) खालील पैकी कोणतीही एक कृती सोडवा. 3

1. टीप लिहा.

i. एकशिंगी गेंडा :

ii. हुलॉक वानर :

2. टीप लिहा.

i. रानम्हशी :

ii. पर्यटनासाठी हत्ती :

3. जंगलातील प्राण्यांच्या चांगल्या सवयीबद्दल माहिती लिहा.

**विभाग ४ - भाषा अध्यन (व्याकरण)**

**प्र. ४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**1) समास -** **(2)**

**सामासिक शब्दांचा विग्रह करून समासाचे प्रकार लिहाः-**

| अ. क्र | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | चहापोहे | ............... | ............... |
| 2. | कृष्णार्जुन | ............... | ............... |

**2) अलंकार -** **(2)**

**खालील उदाहरण वाचून कृती करा.**

खालील वाक्यातील अलंकार ओळखून घटक लिहा.
"राधाचा आवाज कोकीळेप्रमाणे मधुर आहे"

| | |
|---|---|
| अलंकार - ............... | उपमेय - .............. |
| उपमान - .............. | समान गुणधर्म - .............. |

**(आ) भाषासौंदर्य**

**1) शब्दसंपत्ती -**

**(i) विरूद्धार्थी शब्द लिहा.** **(1)**

सुगंध × ...............
फायदा × ...............
स्तुती × ...............
धीट × ...............

**(ii) खालील वाक्यांचे काळ ओळखा.** **(1)**

1) सकाळी आई माझ्या खोलीत येऊन गेली.

**2) लेखननियमांनुसार लेखन -**

**खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.** **(2)**

1) अखेर दर माणशी एक रुपया ईनाम आणि मोफत प्रवाशाचा डंका वाजवला.

2) चीमण्या आणि इतर पक्षी यांनी ते झाड नेहमि गजबजलेले असते.

**3) खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** **(1)**

Action - ...............

**विभाग ५ - उपयोजित लेखन**

**प्र. ५ खालील लेखनप्रकारांपैकी कृती सोडवा.** **(5)**

**खालील विषयावर पत्र लिहा.**

खालील बातमी वाचा व त्याखालील कृती सोडावा

वृत्तपत्र
'नागरिक'
आमच्या वार्ताहराकडून -
'सूर्यकिरण' बालोद्यानासमोरील
रस्त्यावरील खड्ड्यांमुळे
अपघातांची शक्यता
वाहनांची कोंडी आणि रहदारीला व्यत्यय

सजग नागरिक या नात्याने

'सूर्यकिरण' समोरील नादुरुस्त
रस्त्याबाबत परिसरातील
मा. नगरसेवक यांच्याकडे
तक्रार करणारे पत्र लिहा

किंवा

'सूर्यकिरण' समोरील रस्ता दुरुस्त
करण्याची विनंती करणारे
पत्र संबंधित व्यक्तीला लिहा.